**ठळक बातम्या**

- राज्यात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये वार्षिक सरासरीच्या सुमारे ९५ टक्के परदेशी गुंतवणूक

- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासाठी १० एकर जमीन अधिग्रहित करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

- शेतीच्या नुकसानाचे उपग्रहाव्दारे सर्वेक्षण करण्याची केंद्रीय कृषीमंत्र्यांची घोषणा

**आणि**

- देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण, सेन्सेक्स ८० हजारांच्या खाली

**<><><><><>**

परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात राज्य सातत्याने अग्रेसर राहिलं आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये राज्यात वार्षिक सरासरीच्या सुमारे ९५ टक्के गुंतवणूक आली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या आकडेवारीत ही बाब स्पष्ट झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

या कालावधीत १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक राज्यात झाली. हे प्रमाण गेल्या चार वर्षातल्या सरासरीच्या ९४ पूर्णांक ७१ शतांश टक्के आहे.

महाराष्ट्र आता थांबणार नाही, ही घौडदौड अशीच कायम राहील, अशी ग्वाहीदेखील मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

**<><><><><>**

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त त्यांना सर्वत्र आदरांजली वाहण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह इतर मान्यवरांनी सावित्रीबाईंच्या योगदानाचं स्मरण केलं आहे.

सावित्रीबाई फुले या स्त्री सक्षमीकरणाच्या जनक होत्या. शैक्षणिक, सामाजिक सुधारणा क्षेत्रातल्या त्या प्रणेत्या होत्या, असे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या संदेशात स्त्रीशिक्षणासाठी, प्लेगपीडितांसाठी सावित्रीबाईंनी केलेल्या कार्याचं स्मरण केलं आहे आणि सर्व महिलांना **महिला शिक्षण** दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही समाजमाध्यमावरच्या संदेशात सावित्रीबाई फुले यांना आदरांजली वाहिली आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचं स्मरण केलं आहे. सावित्रीबाईंनी महिला शिक्षणाचे दरवाजे उघडले, तसंच समाजातल्या वंचित, पीडित आणि शोषित घटकांच्या हक्कांसाठी जोरदार लढा दिला, असं खरगे यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या द्विशताब्दीपूर्वी त्यांचं स्मारक उभं करण्यासाठी १० एकर जमीन तात्काळ अधिग्रहित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी प्रशासनाला दिले आहेत. ते आज सातारा जिल्ह्यात नायगाव इथं सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंती निमित्त ग्रामविकास विभाग आणि सातारा जिल्हा परिषद यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची द्विशताब्दी आणखी पाच वर्षांनी साजरी होणार आहे. त्यापूर्वी सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानाला साजेशा भव्य स्मारकाचं काम पूर्ण करा. त्यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. फुले दांपत्याच्या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताना ते म्हणाले….

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री**

**<><><><><>**

पांडुरंगाच्या आशिवार्दानं एक मोठा विजय आम्हाला प्राप्त झाला असल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आळंदी इथं भेट दिल्यानंतर व्यक्त केली. वारकरी विचारानंच आपला महाराष्ट्र पुढे गेला आहे, भविष्यातही पुढे जात राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. इंद्रायणी नदीचं पाणी शुद्धिकरणाचा कार्यक्रम सुरु केला आहे, तो युद्धपातळीवर पूर्ण करण्याचं आश्वासनही त्यांनी बातमीदारांशी बोलताना दिलं.

**<><><><><>**

उजनी धरणात उपयुक्त पाणीसाठा ९७ टक्के इतका आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात सिंचनासाठी आणि संपूर्ण उन्हाळा पिण्याचं पाणी उपलब्ध राहील यासाठी सूक्ष्म नियोजन करावं, धरणात पाणी उपलब्ध आहे म्हणून पाण्याची उधळपट्टी अजिबात करू नये, असं आवाहन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं आहे.

**<><><><><>**

शेतकऱ्यांचे होणारे नुकसान आणि पीक विम्याच्या रकमेत होणारी तफावत दूर करण्यासाठी आता उपग्रहाचा वापर केला जाणार आहे. त्यामुळं नुकसानीचं

अचूक मोजमाप होऊन त्यांना खरोखर अपेक्षित भरपाई मिळू शकेल, असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिकमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कृषी विकास केंद्रात आयोजीत किसान संवाद मेळाव्यात बोलत होते.

शेतकरी अन्य राज्यात शेतमाल विकणार असेल, तर त्यासाठी वाहतूकीचा खर्च येईल तो खर्च केंद्र आणि राज्य शासनाने प्रत्येकी पन्नास टक्के करावा, अशी सूचनाही त्यांनी केली. नाफेड सारख्या यंत्रणा कांदा खरेदी करत असताना काही गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यावर आता अशा अनेक पर्यायी यंत्रणा खरेदीसाठी उभ्या केल्या जातील, असं ते म्हणाले. शेतमालाच्या दरवाढीचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा यासाठी यंत्रणा उभारण्याचं आवाहन त्यांनी राज्य सरकारांना केलं.

**<><><><><>**

साधारण १५ दिवसांत राज्याचे वाळूधोरण तयार करण्यात येणार असल्याचा निर्धार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. गौणखनिज आणि वाळूतस्करीसंदर्भात महसूल अधिकाऱ्यांची विस्तृत बैठक घेतली आहे. मागणी आणि पुरवठा यांच्यातील दरी कमी करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. गौण खनिजांबाबतचे अधिकार अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर आज झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले. वीर रेल्वे स्थानकाजवळ एका टोइंग वाहनानं

रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कारला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. ज्यामुळे कारमधले तीन जण जागीच ठार झाले तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी कालच्या सत्रात कमावलेल्या पैकी जवळपास निम्मी तेजी आज घालवली. दिवसअखेर सेन्सेक्स ७२१ अंकांनी घसरुन ७९ हजार २२३ अंकांवर स्थिरावला. निफ्टी १८४ अंकांची घसरण नोंदवून २४ हजार ५ अंकांवर बंद झाला. व्यवहारांच्या दरम्यान निफ्टी २४ हजारांच्याही खाली गेला होता. माहिती तंत्रज्ञान, वित्तीय सेवा आणि औषध उद्योगाच्या समभागात आज घसरण झाली.

**<><><><><>**

नेमबाज स्वप्नील कुसाळे याला यंदा अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्याने आकाशवाणीशी बोलताना आनंद व्यक्त केला. ....

**होल्ड बाईट- स्वप्नील कुसाळे (२९ सेकंद)**

**<><><><><>**

बॉर्डर गावस्कर चषक भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया क्रिकेट कसोटी मालिकेत सिडनी इथं सुरू असलेल्या अखेरच्या सामन्यात भारताचा पहिल्या डाव १८५ धावांवर आटोपला. रोहित शर्मा शिवाय खेळत असलेल्या भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऋषभ पंत नं सर्वाधिक ४० धावा केल्या तर रवींद्र जाडेजा नं २६ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या बोलांड नं ३१ धावात

४ गडी बाद केले. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव सुरु झाला असून दिवसअखेर १ बाद ९ धावा झाल्या आहेत.

<><><><><>

आदिवासी विकास विभागानं नागपूर इथं आयोजित केलेल्या तीन दिवसीय राज्यस्तरीय क्रीडा संमेलनाचं आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झालं. राज्यातल्या नागपूर, नाशिक, ठाणे आणि अमरावती या चार विभागांतल्या शासकीय तसंच अनुदानित आश्रमशाळांमधले १ हजार ९१७ आदिवासी खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

<><><><><>

कॉसमॉस बँकेला बेंगळुरू इथली नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँक सामावून घ्यायला रिझर्व्ह बँकेनं आज परवानगी दिली. यामुळं सोमवारपासून नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या शाखा या कॉसमॉस बँकेच्या शाखा म्हणून ओळखल्या जातील.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, कोकणात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली. तर विदर्भात तुरळक ठिकाणी लक्षणीय घट झाली. सर्वात कमी किमान तापमान गोंदिया इथं ८ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//